राज्यात सन २०१० मध्ये सुरू केलेल्या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांना स्वयं अर्थसहाय्य तत्वावर परवानगी देणे बाबत

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः इंमाशा-१७१४/प्र.क्र.२५०/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांकः ३१ मे, २०१७

वाचा -

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक-नप्राशा-१०१०/(१४६/२०१०)/ प्राशि-३, दिनांक २८/०५/२०१०
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक-नप्राशा-२०११/(१६२/२०११)/ प्राशि-३, दिनांक २५/०९/२०१२
३) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनिमय) अधिनियम, २०१२, दिनाक ०४ जानेवारी, २०१३
४) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनिमय) अधिनियम, २०१२ (दुसरी सुधारणा) अधिनियम २०१३, दिनांक ०२ जुलै, २०१३
५) शासन आदेश, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक-नप्राशा-२०११/(१६२ अ/११)/ प्राशि-३, दिनांक ३०/०८/२०१३
६) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन), नियम, २०१६, दिनांक १३ एप्रिल, २०१६

प्रस्तावना -

शासनाने दिनांक २८ मे, २०१० च्या परिपत्रकान्वये इंग्रजी माध्यमाच्या कायम विना अनुदान तत्वावरील खाजगी संस्थांमार्फत प्राथमिक शाळा सुरू करण्याचे प्रस्ताव मागविण्यात आले होते. या जाहिरातीच्या अनुषंगाने एकूण ७४७५ अर्ज प्राप्त झाले होते. सदर अर्जाची छाननी जिल्हास्तरीय समितीने केल्यानंतर राज्य स्तरीय समितीने प्राथम्यक्रम ठरवून ३११५ ठिकाणी शाळा सुरू करण्याच्या शिफारशी केलेल्या होत्या. सदर ३११५ शाळांचे प्रस्ताव मंत्री मंडळ उपसमितीच्या विचारार्थ सादर करण्यात आले होते. त्यानुसार मंत्रीमंडळ उपसमितीने दिलेल्या निर्णयानुसार या ३११५ शाळांच्या प्रस्तावामधील शाळांना परवानगी देण्याकरिता संदर्भाधीन दिनांक २५ सप्टेबर, २०१२ च्या शासन निर्णयान्वये निकष निश्चित करण्यात आले होते. शासन निर्णय दिनांक २५ सप्टेबर, २०१२ मधील तरतुदीनुसार उपरोक्त प्रस्तावाची तपासणी करुन पात्र ठरणाऱ्या ७५५ शाळांचा प्रस्ताव शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांनी शासनास सादर केला होता.

२. दरम्यान, राज्यात महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ दिनांक ०४ जानेवारी, २०१३ पासून अंमलात आला होता. त्यामुळे सदर

PRINCIPAL
Pasaydan Pratishthan Sanchalit
Dnyanganga English Medium School

अधिनियम अंमलात येण्यापूर्वी जाहिरातीद्वारे मागविण्यात आलेले सर्व अर्ज रद्द करण्याचा निर्णय शासनाने दिनांक ३० ऑगस्ट, २०१३ रोजीच्या पत्रान्वये घेतला होता. तथापि, बऱ्याच संस्थांनी त्यांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता मिळेल या आशेने शाळा सुरु केलेल्या आहेत. तसेच या प्रकरणात बऱ्याच शैक्षणिक संस्थांनी मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर, औरंगाबाद व मुंबई या ठिकाणी वेगवेगळ्या याचिका सादर केल्या आहेत. सदर याचिका मा. न्यायालयाने निकाली काढल्या असून त्यापैकी मा. उच्च न्यायालय खंडपीठ,औरंगाबाद यांनी याचिका क्रमांक ८२८७/२०१३ मध्ये दिनांक २० जुलै, २०१६ रोजी संबंधित याचिका कर्त्याच्या कायम विनाअनुदान तत्वावरील प्रस्तावावर निर्णय घेण्याचा निकाल दिलेला आहे.

३. तथापि, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम २०१२ राज्यात लागु झाला असल्याने सद्यस्थितीत कायम विना अनुदान तत्वावर शाळांना परवानगी देण्याचे धोरण नाही. परंतु कायम विनाअनुदान तत्वावर शाळेस परवानगी म्हणजे कोणतेही अनुदान केव्हाही देय नाही व स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर परवानगी देण्यात येणाऱ्या शाळांनादेखील कोणतेही अनुदान केव्हाही देय नाही हेच सुत्र लागू आहे. शासनाने सन २०१० मध्ये जाहिरात देवून इंग्रजी माध्यमाच्या शाळा कायम विना अनुदान तत्वावर सुरू करण्याचे परिपत्रक काढले होते. तद्नंतर महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम २०१२ राज्यात लागु झाला आहे. तथापि, सन २०१० मध्ये इंग्रजी माध्यमाकरिता प्रस्ताव दाखल केलेल्या शाळांपैकी काही शाळा सन २०१० पासून राज्यात आजतागायत सुरू आहेत. सदर इंग्रजी शाळा ह्या बहुतांशपणे शहरी भागात आहे. त्यामुळे सदर शाळांना स्वयं अर्थसहाय्य तत्वावरील जागे बाबतच्या अटीचे पालन करणे अवघड होत आहे. सदर शाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना परिक्षा देण्याच्या अडचणी येत आहेत. या सर्व बाबी विचारात घेता व मा. न्यायालयाने दिलेले निदेश विचारात घेता विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवून बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ मधील तरतूदींची पूर्तता करणाऱ्या इंग्रजी प्राथमिक शाळांना स्वयं अर्थसहाय्य तत्वावर विशेष बाब म्हणून परवानगी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबतचा शासन निर्णय खालीलप्रमाणे आहे.

**<u>शासन निर्णय:-</u>**

सदर शासन निर्णयासोबतच्या सहपत्रात नमूद करण्यात आलेल्या प्राथमिक शाळांना (इ. १ ली ते ५ वी, इंग्रजी माध्यम) स्वयं अर्थसहाय्य तत्वावर शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून

PRINCIPAL
Pasaydan Pratishthan Sanchalit
Dnyanganga English Medium School
Vadgaon Road, ...

सुरू करण्यास परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे. सदर शाळांनी खालील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

अटी व शर्ती :-

i) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम, २०११ आणि त्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेले आदेश, अधिसूचना, शासन निर्णय, शासन परिपत्रक इ. मधील तसेच यापुढे या संबंधीत शासनाच्या वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या पुढील आदेशांचे पालन करणे. त्याचप्रमाणे, भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित शाळांच्या संस्था चालकांवर राहील. यामध्ये खेळाच्या मैदानासाठी लागणाऱ्या जागेची अट क्र. २ च्या अटीच्या अधीन राहून शिथिल करण्यात येत आहे.

ii) संबंधित शैक्षणिक संस्थांनी खेळासाठीचे मैदान संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांसोबत (जिल्हा परिषद / महानगरपालिका / नगरपालिका / नगर परिषदा / कटक मंडळे इ.) सामंजस्य करार (MOU) करणे बंधनकारक राहील. संबंधित शिक्षणाधिकारी यांचेकडे अशा करारपत्राची प्रत प्रथमत: यांचेकडे आगाऊ स्वरुपात सादर केल्यानंतर मान्यता देण्यात यावी.

iii) एका मुलासाठी एका वर्षासाठीचे शैक्षणिक शुल्क हे महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ नुसार निर्धारित केलेले असावे.

iv) संस्था किंवा शाळे बाबत अर्थिक अनियमिततेच्या गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नसाव्यात.

२. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक, यांची राहील.

३. उपरोक्त बाबींची पुर्तता संबंधित शाळा करीत असल्यास या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा. त्यानुसार प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची संबधित शिक्षणाधिकारी(प्राथमिक) यांनी उपरोक्त निकषांची पुर्तता होत आहे किंवा नाही याची तपासणी करुन पात्र होणाऱ्या शाळांची प्रथम मान्यता देण्याची कार्यवाही करावी.

४. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी

PRINCIPAL
Pasaydan Pratishthan Sanchalit
Dnyanganga English Medium School

दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

५. यु-डायस डाटा- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा बाबत U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, "स्वयंअर्थसहाय्यित शाळा " म्हणून नोंद करावी. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा " असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

६. परवानगी देण्यात आलेल्या शाळेस शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदी व त्यानुषंगाने निर्गमित करण्यात आलेले आदेश व नियम यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रा.ग.गुंजाळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत, --

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
३. मा. मंत्री, ( शालेय शिक्षण), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांचे खाजगी सचिव
४. आयुक्त, (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
५. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
६. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
९. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक)
१०. सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११. निवडनस्ती (एसएम २).

PRINCIPAL

शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक इंमाशा-१७१४/ प्र. क्र. २५०/एस एम-२, दिनांक ३१ मे, २०१७ चे सहपत्र

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | शाळेचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|
| ३१ | | बाबा ताज अकॅडमी, नागपुर | इक्रा पब्लीक स्कुल, ताजबाग, नागपुर |
| ३२ | | आस्था सोशल असोसिएशन, नागपुर | कमल कॉन्हेट, शेषनगर, खरबी रोड, नागपुर |
| ३३ | | संत कबीर बहु. शिक्षण संस्था, चंद्रपुर | किड्स कॉन्हेट, जुनी मंगळवारी, नागपुर |
| ३४ | | शाक्यमुनी मेमोरियल ट्रस्ट, नागपुर | लोटस पब्लक स्कुल, न्यु नेहरुनगर, महाळगीनगर चौक, नागपुर |
| ३५ | | मा भवानी बहु. शिक्षण संस्था नागपुर | गुरुकुल पब्लीक स्कुल,बुटीबोरी ता जि नागपुर |
| ३६ | | श्री राजारामजी दुबे बहु शिक्षण संस्था हिंगणा रोड नागपुर | डॉल्फीन स्कुल गोधनी रेल्वे ता जि नागपुर |
| ३७ | अमरावती | श्री विठ्ठलानंद बहु संस्था , खारतळे गाव ता जि अमरावती | लीटल स्टार इंग्रजी प्राथमिक शाळा, खारतळेगाव, ता भातुकली जि अमरावती |
| ३८ | | सुशीला बाई देवूसकर प्रतिष्ठाण अमरावती | एसडीएफ प्रायमरी स्कुल, गणेडी वाल लेआऊट वृदावन कॉलनी अमरावती |
| ३९ | | स्व. इंदीराताई अंबादास इंगळे, बहु. शिक्षण संस्था. कुऱ्हा | आयडीएल स्कुल इंग्रजी स्कुल कुऱ्हा |
| ४० | | श्री विद्यासागर एज्युकेशन सोसायटी अमरावती | पॅनोरमा इन्टरनॅशनल स्कूल, उर्वशीनगर नित्यनद कॉलनी कठोरा रोड अमरावती |
| ४१ | | विश्वभारती बहु शिक्षण संस्था | ब्राईट किड्स इंग्लीश स्कुल, अकोली रोड अमरावती |
| ४२ | चंद्रपुर | मेषमुशी बहु संस्था गडचांदुर ता कोरपना जि चंद्रपुर | ग्रीनफिल्ड इंग्लीश स्कुल, गडचांदुर ता कोरपना जि चंद्रपुर |
| ४३ | | मुक्तांग सांस्कृतिक शिक्षण संस्था चार्मोशी | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज इंग्लीश मिडिअम सांगोडा ता कोरपना जि चंद्रपुर |
| ४४ | | दिपस्तंभ बहु शिक्षण संस्था राजुरा | ब्रिलियंट कॉन्हेट स्कुल रामपुर पो आर्वी ता राजुरा जि चंद्रपुर |
| ४५ | | विद्यासागर एज्युकेशन सोसायटी चंद्रपुर | विद्यासागर इंग्लीश स्कुल खुटाळा दक्षता नगर खुटाळा चंद्रपुर |
| ४६ | | राष्ट्र संत बहु. विकास संस्था चंद्रपुर | संस्कार कॉन्हेट सरकार नगर चंद्रपुर |
| ४७ | | आनंद मल्टीपरपज एज्युकेशन सोसायटी चंद्रपुर | बालाजी इंग्लीश स्कुल गुरुनगर चिचोडी ता भद्रावती जि चंद्रपुर |
| ४८ | | मधुकरराव दर्वेकर बहु शिक्षण संस्था चंद्रपुर | संकल्प कॉन्हेट स्कुल भोयेगाव ता कोरपना जि चंद्रपुर |
| ४९ | | आनंद मल्टीपरपज एज्युकेशन सोसायटी चंद्रपुर | तिरुपती इंग्लीश स्कुल रहमतनगर गुटकाळा वार्ड चंद्रपुर |
| ५० | | कार्तीक स्वॉमी शिक्षण संस्थ गोडपिंपरी जि चंद्रपुर | ब्राईट चिल्ड्रन कॉन्हेट गोडपिंपरी ता गोडपिंपरी जि चंद्रपुर |
| ५१ | | ज्ञानसेवा समिती चंद्रपुर | शांती निकेतन कॉन्हेट बाबुपेठ चंद्रपुर |
| ५२ | | क्रिसेंट शिक्षण प्रसारक मंडळ बल्लारपुर जि चंद्रपुर | क्रिसेट पब्लीक स्कुल बल्लारपुर |

PRINCIPAL
Pasaydan Pratishthan Sa...
Dnyanganga English Medi...
Vedgaon Road, Akhadi...

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | शाळेचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|
| १ | पुणे | माँ दुर्गा शक्ती महिला संस्था | नॅशनल इंग्लीश मिडिम स्कुल, भारती विद्यापीठाच्या मागे दत्त नगर, आंबेगाव, पुणे |
| २ | | इन्फंट जिजस एज्युकेशन सोसायटी, केशन नगर पुणे | इन्फट जिजस प्रायमरी स्कुल, स न ४९२/२ ओ/१ बी, केशन नगर, कासारवाडी पुणे |
| ३ | | अक्सा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे | नॅशनल पब्लीक स्कुल, जाधवनगर भाग-२, कात्रज, पुणे |
| ४ | * | पसायनदान प्रतिष्ठाण आळंदी देवाची ता खेड जि पुणे | ज्ञानगंगा इंग्लीश स्कुल, आळंदी देवाची ता खेड जि पुणे |
| ५ | | विक्टर एज्युकेशन सोसायटी | व्हॅल्यू इंग्लीश मिडिअम स्कुल, स न ३९ शिंदे वस्ती केशवनगर पुणे ता हवेली जि पुणे |
| ६ | | कॅथॅलिक ख्रिश्चन असोसिएशन ऑफ इग्नायटेड माईड्स | द रेमणड्स प्रायमरी स्कुल, वाघोली-आव्हाळवाडी रोड पुणे |
| ७ | | जे पी हेल्थ फाउंडेशन, सुभाष पार्क,चिंतामनीनगर, हडपसर पुणे | स्वॉमी विवेकानंद प्रायमरी स्कुल, सुशीलश्री बिल्डींग, सदाशिवनगर, हांडेवाडी रोड, हडपसर, पुणे |
| ८ | | सेट कृष्णादेवी एज्युकेशन सोसायटी पुणे | सेट कृष्णा इंग्लीश मिडिअम स्कुल, शिक्रापुर ता शिरूर जि पुणे |
| ९ | | रिलायेबल एज्युकेशन सोसायटी | जॅक ॲन्ड जिल इंग्लीश मिडिअम स्कुल स न १२५, टु कॉर्नर हॉटेल जवळ, मुंढवा मांजरी रोड पुणे |
| १० | | दि कॉस्मोपॉलिटन एज्यूकेशन सोसायटी पुणे | इंडियानाज इंग्लीश मिडिअम स्कुल, स.न. ५, आश्रफनगर, कोंढवा ब्रु पुणे |
| ११ | | संस्कार फाऊंडेशन, ससाने नगर, हडपसर, पुणे | संस्कार प्रायमरी स्कुल, ग्रीनलीफ सोसायटी, तळमजला, ससानेनगर, हडपसर, पुणे |
| १२ | नागपुर | नादिन्य महिला बहु. तांत्रीक शिक्षण संस्था, नागपुर | रेडरोज इंग्लीश मिडिअम स्कुल, महाजनवाडी (वानाडोंगरी) नागपुर |
| १३ | | मा भवानी बहु. शिक्षण संस्था नागपुर | गुरुकुल पब्लीक स्कुल, वड्धामना ता हिंगणा जि नागपुर |
| १४ | | उज्वल बहु शिक्षण संस्था वाडी नागपुर | न्यु स्टार पब्लीक स्कुल, सोनबा नगर, नागपुर |
| १५ | | श्री साईनाथ महिला एज्युकेशन सोसायटी नागपुर | एसएन पब्लीक स्कुल गोधने रेल्वे ता जि नागपुर |
| १६ | | श्री साईनाथ मल्टीपरपज एज्युकेशन सोसायटी नागपुर | वंडरफुल स्कुल वृंदावन नगर, शाहु मोहल्ला नागपुर |
| १७ | | पाच्यन्य मल्टीपरपज सोसायटी नागपुर | पीएमबीएस कॉन्हेंट गोन्हीसिम बहादुरा नागपुर |
| १८ | | फबिहा बहुऊद्देशीय शिक्षण संस्था | के.जी. एन. प. स्कुल |
| १९ | | ग्लोबल वेलफेअर असोसिएशन नागपुर | हनी कॉन्हेंट, मिसाळ लेआऊट |
| २० | | शुभम बहुउद्देशीय शिक्षण संस्था, नागपुर | महेश कॉन्हेंट, महाल, नागपुर |
| २१ | | फिरोज विद्या समिती, मिलींदनगर, नागपुर | फिरोज गांधी प्राथमिक विद्यालय, मिलींदनगर, नागपुर |
| २२ | | भारतीय बाल विज्ञान बहु. शिक्षणसंस्था, बापुवाडी | न्यु पॅराडाईज कॉन्हेंट |
| २३ | | रंगप्रवाह एज्युकेशनल ॲन्ड कल्चरल अकादमी, राणी दुर्गावती नगर | माणिकलाल गांधी पब्लीक स्कुल |
| २४ | | न्यु मॉडर्न सोसायटी, सादिकाबाद मानकापुर | अप्सर इंग्लीश प्रायमरी स्कुल, बजफ कॉलनी सादिकाबाद, मानकापुर, नागपुर |
| २५ | | शिवांजली शिक्षण संस्था पीटीएस क्वॉर्टर, चंदननगर, नागपुर | श्री सप्तगिरी कॉन्हेंट, चंदननगर, नागपुर |
| २६ | | बाबा दिवान एज्युकेशन सोसायटी, नागपुर | दिवान कॉन्हेंट भांडेवाडी, पारडी, नागपुर |
| २७ | | अनाथ पिंडक शैक्षणिक व बहु. संस्था, सावित्री बाई फुले,नागपुर | सनशाईन इंग्लीश स्कुल, नागपुर |
| २८ | | आशीर्वाद कुल मंदीर, नागपुर | सक्सेस पॉईंट सुयोग नगर, धाडीवार लेआऊट, नागपुर |
| २९ | | सोनामाता बहु. शिक्षण संस्था, नागपुर | मा शारदा कॉन्हेंट किती नगर, नागपुर |
| ३० | | दिपदल शिक्षण प्रसारक मंडळ, सर्वश्रीनगर, दिघोरी, नागपुर | डीडी इंग्लीश स्कुल, सर्वश्री नगर, नागपुर |

https://mail.gov.in/iwc_static/layo...

Welcome Santosh Gaikwad Themes Help Sign out

gov.in

Sent

Get Mail Write Reply

sm2.sesd-mh@

Inbox (12

SMS

Trash

Sent

Drafts (2)

ProbablyS

Subject

शासननिर्णय दि.31.5.2017

शासननिर्णय दि.31.5.2017

शासननिर्णय दि.31.5.2017

Fwd: Re: Hon'ble CS Me

gr ad

gr print

Fwd: भाषा व गणित विषय :

note draft

gr


ppt

self finance gr draft

Subject: **शासननिर्णय दि.31.5.2017 इ**

To: SarjeraoJadhav Director

इंग्रजी शाळा 2010 GR... (354kB)




PRINCIPAL
Pasaydan Pratishthan Sanchalit
Dnyanganga English Medium School
Vadgaon Road, Alandi (Dev.)

Messages

Calendar 130

Address Book

Options

Buddy List

Date: 06/14/17 06:37 PM
From: "Santosh Gaikwad" <sm2.sesd-mh@gov.in>

[illegible] [illegible] दि.31.5.2017 इंग्रजी शाळा 2010

To: [illegible] Director <doesecondary@mahedu.gov.in>, [illegible] com, dydnagpur@gmail.com, [illegible] <[illegible]amt@gmail.com>, dydpune@gmail.com

[illegible] 2010 GR 31.5.2017.pdf (354kB)

PRINCIPAL
Pasaydan Pratishthan Sanchalit
Dnyanganga English Medium School
Vadgaon Road, Alandi (Dev.)

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१९/प्र.क्र.१२४६/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २० सप्टेंबर, २०१९

प्रस्तावना -

पसायदान प्रतिष्ठाण, मु.पो. आळंदी देवाची, ता. खेड, जि. पुणे संचलित ज्ञानगंगा इंग्लिश मिडिअम स्कुल, आळंदी देवाची, ता. खेड, जि. पुणे या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ देण्याचा प्रस्ताव शासनास सादर झाला आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत पसायदान प्रतिष्ठाण, मु. पो. आळंदी देवाची, ता. खेड, जि. पुणे संचलित ज्ञानगंगा इंग्लिश मिडिअम स्कुल, आळंदी देवाची, ता. खेड, जि. पुणे या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता ६ वी ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ) शाळेस सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ देण्यास खालील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती-

१) संस्थेने प्रस्तावित शाळा शासन मंजुरीपूर्वी सुरु केली नसल्याची संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी खात्री करावी. तथापि सदर शाळा शासन परवानगी घेण्यापूर्वीच सुरु केली असल्यास विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी सदर शाळेकडून रु. १ लाख इतका दंड वसुल करुन त्याचा अहवाल शासनास सादर करावा.

२) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा-या सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

३) शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे :-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पूर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१९-२० करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आ
शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असले
उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करून या शासन निर्णयाच्या दि
अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिले
आपोआपच रद्दबातल ठरेल.

४) परवानगी देण्यात आलेल्या शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम २०१२ (सन २०१३ चा ०४) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

५) संबंधित सक्षम अधिकाऱ्यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली अ करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यास दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शा परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

७) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ बाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Information System for Educatio भरताना, "*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतं करुन यु-डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित सं याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्रा परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्याचप्रमाणे, संबंधितांच्या माहितीकरीता "स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन श परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आ

८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित वि उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रा. वि. कुडले)
कार्यासन अधिकारी, महाराष्

प्रत,

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जि.प., पुणे.
७. निवड नस्ती (एसएम-२) (१२४६/२०१९)